# संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २५२/२०२३
# निशाणी ०३ कडे आदेश
**(CNR No. MHRT 080005872023)**

प्रस्तूत अर्जाद्वारे पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे देवरुख यांनी सदरील पोलीस ठाण्यातील गुन्हा नोंद क्र. ९४/२०२३ मधील मुद्देमाल नष्ट करणेबाबत किंवा लिलाव करुन विकणेबाबत परवानगी द्यावी याकरिता विनंती केली आहे.

०२. त्यांचे म्हणणे असे की, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम चे कलम ६५ (ई) अन्वयेचा उपरोक्त गुन्हा नोंद करणेत आला. त्यात जप्त मुद्देमाल खालीलप्रमाणे आहे–

> २५ लिटर मापाची सफेद मळकट रंगाची दोन प्लॅस्टीक कॅन त्यात प्रत्येकी २५ लिटर प्रमाणे एकूण ५० लिटर गावठी हातभट्टी दारु असलेले.

०३. वरील जप्त मुद्देमाल पोलीस ठाण्यात जमा आहे. मुद्देमाल ठेवण्यास जागा अपूरी आहे. त्यामुळे मिळून आलेला वरील मुद्देमाल नाश करण्यासाठी व विक्री योग्य असलेल्या साहित्याचा लिलाव करण्यासाठी आदेश व्हावेत अशी विनंती प्रस्तुततच्या अर्जान्वये पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे देवरुख यांनी केली आहे.

०४. आरोपीने सदर प्रकरणी जप्त मुद्देमालाशी त्याचा काही संबंध नाही. त्याबाबत योग्य तो आदेश पारीत करावा, असे म्हणणे मांडले आहे.

०५. प्रस्तूत प्रकरणी दोषारोपपत्र दाखल झाले आहे. आरोपीचे प्रतिकथन नोंदवून घेतले आहे. प्रस्तूत प्रकरण संपरीक्षेकरिता प्रलंबित आहे. संपरीक्षा पूर्ण होवून प्रकरण निकाली निघण्यास काही अवधी लागणार आहे. वरील सर्व बाबी पाहता, कलम ४५१ फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ अन्वये मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो–

<u>**आदेश**</u>

१. अर्ज मंजूर करणेत आला.

२. २५ लिटर मापाची सफेद मळकट रंगाची दोन प्लॅस्टीक कॅन त्यात प्रत्येकी २५ लिटर प्रमाणे एकूण ५० लिटर गावठी हातभट्टी दारु असलेला मुद्देमाल निरुपयोगी असल्याने नष्ट करण्यात यावा.

३. वरीलप्रमाणे कार्यवाहीबाबत सविस्तर पंचनामा करण्यात यावा.

**स्वाक्षरीत/-**

दिनांक १२/०१/२०२४

**(ब. द. तारे)**

न्यायदंडाधिकारी वर्ग-१, देवरुख

-:CERTIFICATE:-

Judgment/order in ( Order below Exh. 03 in S.C.C. No. 252/2023)

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date | :- | 12/01/2024 |
| Order signed by PO. on | :- | 12/01/2024 |
| Order uploaded on | :- | 12/01/2024 |